वाचले - १)जाहिरात प्रकटन क्र. प्रशा/११/कावि/१०३९/२०१८ दि. ०३/०९/२०१८

२) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडील दि.२३/८/२०१८ चे पत्र

३)मा. सहा.आयुक्त प्रशासन यांचेकडील दि. ३१/१०/२०१८ चा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
माहिती व तंत्रज्ञान विभाग
मातंवि/५/कावि/७६०/२०१८
दिनांक - ३१/१०/२०१८

**विषय :- शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत महानगरपालीका आस्थापनेवर "पासा" शिकाऊ उमेदवारांची नेमणूक करणेबाबत**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शिकाऊ उमेदवार अधिनियम-१९६१ अंतर्गत सन-२०१८-१९ चे सत्राकरीता शिकाऊ उमेदवारांचे अर्ज मागविणेस महापालिका वेबसाईटवर जाहिरात प्रकटन वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आले होते. वाचले क्र.२ नुसारचे पत्रानुसार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी सन-२०१८ करीता व्यवसाय निहाय शिकाऊ उमेदवारांची नेमणूक प्रथम प्राप्त अर्जामधुन करण्यात यावी व उर्वरीत उमेदवारांची नेमणूक निकाल प्रसिध्दी नंतर करण्यास कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २०१८-१९ या सत्राकरीता शिकाऊ उमेदवारांची रिक्त जागेवर आरक्षण व गुणानुक्रमानुसार नेमणूक करण्यात येत आहे.

| अ क्र. | नाव | जात/ कॅटेगरी |
|---|---|---|
| 1 | नितनवरे प्रतिक्षा बंडुजी | खुला -महार अनु.जाती |
| 2 | लोंढे सागर बिभीषणराव | खुला -मराठा |
| 3 | नागपुरे प्रिया ओमप्रकाश | खुला -लोधी इ.मा.व |
| 4 | शेळके बबन उध्दव | खुला -मराठा |
| 5 | पवार ऋषिकेश बाळासाहेब | खुला - माळी इ.मा.व |
| 6 | अहिरे रेवती सुहास | खुला -महार अनु.जाती |
| 7 | काळे राणी महादेव | खुला - लोहार |
| 8 | त्रिंबके किरण राजु | खुला -चांभार अनु.जाती |
| 9 | गावित सारिका रमेश | खुला -भिल्ल अनु.जमाती |
| 10 | गोरले चंचल मनोहर | खुला -कोळी वि.मा.प्र |
| 11 | तायडे अश्विनी महादेव | खुला -बौद्ध अनु.जाती |
| 12 | उमक आकाश भिमराव | खुला -धोबी इ.मा.व |
| 13 | खुडे अनिल बळीराम | खुला -आंध अनु.जमाती |
| 14 | सानप ऋतिक वाल्मिक | खुला -वंजारी भज-ड. |
| 15 | दळवी अजय मोतीसींग | खुला -बंजारा विमुक्तजाती |

| | | |
|---|---|---|
| 16 | मानकर हेमंत प्रभाकर | खुला -महार अनु.जाती |
| 17 | दराडे निबास पुरभा | खुला -वंजारी भज-ड |
| 18 | राठोड प्रियंका रमेश | खुला -बंजारा विमुक्तजाती |
| 19 | कांबळे दिक्षा मच्छिंद्र | खुला -महार अनु.जाती |
| 20 | जुमळे योगेश अरुण | खुला -कोळी एस.बी.सी |
| 21 | गावित प्रितीशा दारासिंग | खुला -भिल्ल अनु.जमाती |
| 22 | पवार शितल बबन | खुला -वडार विमुक्त जाती |
| 23 | चव्हाण वैष्णवी मुलचंद | खुला -बंजारा विमुक्तजाती |
| 24 | इंगळे निरंजन अरुण | खुला -बौद्ध अनु.जाती |
| 25 | साळवे सुरज सुनिल | महार - अनु.जाती |
| 26 | गायकवाड अभिषेक अर्जुन | खुला -मराठा |
| 27 | घोडके नरेंद्र रामचंद्र | खुला -माळी इ.मा.व |
| 28 | लोखंडे शिवकन्या सुदाम | खुला -मातंग अनु.जाती |
| 29 | काळे सिद्धेश नाना | खुला - मराठा |
| 30 | वाघमारे रुपाली पांडुरंग | खुला -बौद्ध अनु.जाती |
| 31 | पिसे ज्ञानेश्वर दत्तात्रय | खुला -धनगर भज-क |
| 32 | वसावे अरविंद रामजी | खुला - भिल्ल अनु.जमाती |
| 33 | जाऊरकर अक्षय रामराव | खुला -शिंपी इ.मा.व |
| 34 | पारडकर रोहिणी राजेभाऊ | खुला -धनगर भज -क |
| 35 | नेहेते भुषण रामदास | खुला-लेव्हे पाटीदार इ.मा.व |
| 36 | सात्रळकर साक्षी संजय | महार- अनु.जाती |
| 37 | गायकवाड रवि विठ्ठलराव | महार- अनु.जाती |
| 38 | आराख किरण गजानन | महार-अनु.जाती |
| 39 | वानखडे पल्लवी बाळू | महार- अनु.जाती |
| 40 | शहारे आरती भाऊदासजी | महार- अनु.जाती |
| 41 | सात्रळकर प्रीती संजय | महार- अनु.जाती |
| 42 | दाणि वैभव राजेश | महार- अनु.जाती |
| 43 | डांगे दिपा दौलत | महार- अनु.जाती |
| 44 | आव्हाडे पल्लवी दिलीप | बौध्द- अनु.जाती |
| 45 | वसावे दिनकर राया | भिल्ल अनु.जमाती |
| 46 | गावित सुवर्णा देवराम | कोकणी- अनु.जमाती |
| 47 | साबळे कविता राजाराम | कोकणी -अनु.जमाती |
| 48 | पवार प्रविण संतोष | बंजारा विमुक्तजाती |
| 49 | वडार राहूल बाबासाहेब | वडार विमुक्तजाती |
| 50 | नागपुरे आकाश मारोती | ढिवर भ.ज. (ब) |
| 51 | गोलाईतकर ऋषिकेश गजानन | लोहार भ.ज. (ब) |

| | | |
|---|---|---|
| 52 | ठावरी आकाश लक्ष्मण | कुणबी - इ.मा.व |
| 53 | मैंदर्गी आदित्य दिगंबर | कासार- इ.मा.व |
| 54 | सुरुशे विठ्ठल माधवराव | न्हावी- इ.मा.व |
| 55 | पाटील समाधान आनंदा | कुणबी - इ.मा.व |
| 56 | पाचघरे मोहिनी प्रदिपराव | माळी - इ.मा.व |
| 57 | डवले धनंजय सुरेश | तेली - इ.मा.व |
| 58 | बोरसे सागर बारकु | तेली इ.मा.व |
| 59 | आहेर शांताराम मधुकर | माळी इ.मा.व |
| 60 | वारांगणे गणेश विठ्ठल | कुणबी- इ.मा.व |
| 61 | तेली विनोद विजय | तेली - इ.मा.व |
| 62 | सारंगे शिवानी मारोती | माळी - इ.मा.व |
| 63 | सोनवणे योगेश किशोर | धोबी – इ.मा.व |
| 64 | सोनवणे दिपाली महेंद्र | न्हावी- इ.मा.व |
| 65 | अहिरराव दिगंबर नीलकंठ | सोनार - इ.मा.व |

सन २०१८ -२०१९ चे सत्राकरिता **"पासा"** व्यवसायाचे पदावर प्रशिक्षणार्थी म्हणुन एक वर्ष कालावधीसाठी खालील प्रमाणे शिकाऊ उमेदवारांना नेमणुक देण्यात येत आहे.

वरील शिकाऊ उमेदवारांकरीता प्रशिक्षण कालावधीमध्ये खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१) Web site :- www.apprenticeship.gov.in (DGET MIS PORTAL) यावरील उमेदवारांचे रजिस्ट्रेशन असणे आवश्यक आहे. व्यावसायिक प्रशिक्षणार्थी म्हणून या आदेशान्वये देण्यात आलेली नेमणूक पूर्णत: निश्चित कालावधीची आहे. प्रशिक्षण कालावधी पुर्ण होताच दिलेली नेमणूक संपुष्टात येईल. नेमणुक देण्यात आलेल्या व्यावसाईक पदावरील प्रशिक्षणार्थींचा महापालिका आस्थापनेवर कोणत्याही प्रकारचा हक्क राहणार नाही.

२) सदरची नेमणूक ही उमेदवारांनी सादर केलेल्या शैक्षणीक अर्हता व तांत्रिक पात्रता (आयटीआय) उत्तिर्ण तसेच शाळेचे, जातीचे, आधारकार्ड, एम.आय.एस पोर्टलवरील रजिस्ट्रेशन इत्यादी प्रमाणपत्राच्या छायांकीत सत्यप्रती तपासून देण्य़ात आलेली आहे. त्यामध्ये काही तफावत आढळून आल्यास तसेच प्रशिक्षणार्थींनी आदेशातील अटी व शर्तिंचा भंग केल्यास देण्यात आलेली नेमणूक तात्काळ रद्द करण्यात येईल. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

३) नेमणूक दिलेल्या शिकाऊ उमेदवारांनी महापालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागामध्ये त्वरीत रूजू होऊन शाळेच्या व जातीच्या व शैक्षणीक अर्हतेची मुळ प्रमाणपत्रासह दोन प्रतित सत्यप्रती तसेच कॉन्ट्रॅक्ट फॉर्म स्वतंत्र तीन प्रतित टंकलिखित करून साक्षीदारांच्या सहीने रूजू होताना सादर करणे आवश्यक राहील. कॉन्ट्रॅक्ट फॉर्म अपूर्ण तसेच खाडाखोड व चुकीचे असल्यास स्विकारले जाणार नाहीत.त्वरीत रूजू न झाल्यास कोणताही पत्रव्यवहार न करता तुमची नेमणूक रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

४) शिकाऊ उमेदवारास नेमुन दिलेला प्रशिक्षण कालावधी पूर्ण करावा लागेल. या कालावधीत कोणतीही तात्पुरत्या स्वरुपातील नोकरी इतरत्र करता येणार नाही. त्याचप्रमाणे रु १००/- चे स्टॅम्प पेपरवर गॅप सर्टिफिकेट सादर करावे.

५) प्रशिक्षण कालावधीत उमेदवाराची गैरहजेरी व गैरवर्तणुक आढळल्यास त्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना अथवा नोटीस न देता प्रशिक्षणार्थी पदावरुन कमी केले जाईल कोणताही मोबदला दिला जाणार नाही.

६) अधिनियम १९६१ मधील नियम पोट कलम (अ) १ नुसार वर्षात ०८ दिवस किरकोळ रजा, नियम ९ (ब) १ नुसार १५ दिवस वैद्यकीय रजा अनुज्ञेय राहतील. या व्यतिरिक्त अन्य फायदे अथवा सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत. तसेच दर तीन महिन्यानंतर वेगवेगळ्या विभागात तसेच क्षेत्रिय कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून काम करणे क्रमपात्र असणार आहे.

७) प्रशिक्षणाची वेळ ही संबधीत कार्यालयाचे वेळेप्रमाणे राहील. सर्व शासकीय सुट्टया देय राहतील. उमेदवारांना शिफ्टमधील कामकाज नाही. नेमणूक दिलेल्या व्यवसाय निहाय पदाचेच काम करणे बंधनकारक राहील अन्य कोणतेही कामकाज करता येणार नाही तसे झाल्यास उमेदवार मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, पुणे यांचेकडे तक्रार दाखल करू शकतील.

८) शिकाऊ उमेदवारांची संविदा मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी,पुणे- १९. यांचे कार्यालयात कोणत्याही कारणास्तव ऑनलाईन (रजिस्ट्रेशन) नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास त्यांची नेमणूक त्वरीत रद्द होऊन त्यांना परिक्षेस बसण्यास अडचण निर्माण होऊ शकते. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी, पुणे. यांचे आदेशानुसार उमेदवारांना कार्यमुक्त करण्यात येईल याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

९) नेमणुक दिलेल्या उमेदवारांनी महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात त्वरीत रुजू व्हावे. रुजू न झाल्यास कोणत्याही प्रकारचा पत्र व्यवहार न करता नेमणुक रद्द झाली आहे. असे समजण्यात यावे.

१०) मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, निगडी, पुणे-१९. यांचे मार्फत होणा-या परिक्षेस बसण्यास आवश्यक कागदपत्रांची तसेच परिक्षा फीची पुर्तता संबधीत उमेदवारांनी स्वत: करावयाची आहे. त्याकरीता प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या तीस दिवस आधी माहिती व तंत्रज्ञान विभागातील टेबल क्र.०५ यांचेकडे संपर्क साधून माहिती घ्यावी. त्याचप्रमाणे दरमहाची हजेरीपत्रकावरील उपस्थितीव विद्यावेतन जमा झालेल्या बँकपासबुकची छायांकीत प्रत संबधीत शाखाप्रमुखाचे स्वाक्षरीने माहिती व तंत्रज्ञान विभागात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षेस बसता आले नाही या कारणास्तव उमेदवार स्वत: जबाबदार राहिल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

११) उमेदवारांनी नेमणूक दिलेल्या विभागात रूजू झाल्यानंतर स्वत:चे ओळखपत्र तसेच बँकपासबुक दोन दिवसात प्राप्त करून संबधित विभागास सादर करावे. त्याचप्रमाणे माहिती वतंत्रज्ञान विभागाकडून थंम्ब करून घ्यावे आपल्याला देण्यात येणारे विद्यावेतन थंम्ब रिपोर्टवरून अदा करण्यात येणार आहे. त्यामुळे कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेतच उपस्थित रहावे व कार्यालयीन वेळेनंतरच कार्यालय सोडणे बंधनकारक राहील. याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१२) भारत सरकार यांचे राजपत्र दि.२२ सप्टेंबर २०१४ अन्वये शिकाऊ उमेदवारांना निश्चित केलेल्या दरानुसार विद्यावेतन अनुज्ञेय राहिल.

सही/-
सहाय्यक आयुक्त (प्रशासन)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति -
सर्व संबंधित शिकाऊ उमेदवार म्हणून नेमणुक देण्यात आलेले सर्व संबंधित उमेदवार यांचे माहितीकरीता महापालिका वेबसाईटवर प्रसिध्दी करण्यात येईल.

प्रत - १) लेखा विभाग २) मुलेप विभाग ३) संबंधित विभाग

२/- शिकाऊ उमेदवारांना विभागामध्ये रूजू झाल्याच्या दिनांकापासून विद्यावेतन अनुज्ञेय करण्यात यावे तसेच त्यांना आपले नियंत्रणाखाली विविध विभागांमध्ये तसेच क्षेत्रीय कार्यालयात दर तीन महिन्यानंतर प्रशिक्षणार्थी म्हणून नेमणूक देण्यात यावी. उमेदवारांना दरमहा द्यावयाचे विद्यावेतन, कामगार कल्याण विभागाकडून दर सहा महिन्यांनी किमान वेतनाचे दर मागवून प्रशिक्षणाचे कालावधीनुसार एकूण अर्धकुशल किमान वेतनाचे ७०%, ८०%, ९०% याप्रमाणे विद्यावेतन प्रत्येक महिन्याचे पाच तारखे पर्यंत देणेत यावे. (प्रशिक्षण कालावधी सहा महिने ते एक वर्ष) अर्धकुशल शिकाऊ उमेदवारांचा कालावधी आय.टीय.आय. प्रशिक्षण उत्तीर्ण नसलेल्या रेडोओलॉजी, कार्डीओलॉजी, पॅथॉलॉजी सहा महीने प्रशिक्षण कालावधी, गार्डनर एकवर्षाचा कालावधी आहे. या उमेदवारांना दरमहा किमान वेतनाच्या ७०%, विद्यावेतन अनुज्ञेय आहे. एकवर्षाचे आय.टी.आय प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना महापालिकेतील दुस-या वर्षाच्या प्रशिक्षणाकरीता दरमहा अर्धकुशल किमान वेतनाच्या ८०% विद्यावेतन अनुज्ञेय राहील. दोन वर्षांचे आय.टी.आय.प्रशिक्षण उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना महापालिकेतील तिस-या वर्षाच्या प्रशिक्षणाकरीता अर्धकुशषल किमान वेतनाच्या **९०%** विद्यावेतन अनुज्ञेय राहील.) याबाबत काही संभ्रम असल्यास प्रशासनाकडील टे.क्र.११ याचेशी संपर्क साधणेत यावा.

प्रशिक्षणार्थींना प्रत्येक महिन्याचे ०५ तारखेपुर्वी बायोमेट्रीक थंम्ब हजेरी प्रमाणे विद्यावेतन न विद्यावेतन त्यांचे बँक खात्यामध्ये जमा केल्याचा पुरावा म्हणून बँक पासबुकची प्रत व बायोमेट्रीक हजेरीची छायांकीत प्रत शाखाप्रमुख/विभागप्रमुख यांचे स्वाक्षरीने प्रशासनास सादर करावी. सदरची माहिती दर महिन्याचे ०५ तारखे पर्यंत सादर न केल्यास अथवा विलंबाने सादर केल्यास शासनाकडून मिळणा-या परताव्याच्या रकमेची सर्वस्वी जबाबदारी संबधित कर्मचारी विभागप्रमुख/शाखाप्रमुख यांची राहील. प्रशिक्षणार्थींना त्यांचे व्यवसायाचे सखोल प्रशिक्षण देण्यास संबधीत अधिकारी/कर्मचारी यांना सूचना देण्यात याव्यात. व्यवसाय निहाय प्रशिक्षण देण्यात यावे त्यांच्यावर इतर कामे सोपविण्यत येऊ नयेत. प्रशिक्षणार्थीनी याबाबत मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सूचना केंद्र पुणे. यांचेकडे तक्राक केल्यास त्यास संबधित जबाबदार राहतील. प्रशिक्षणार्थी सतत गैरहजर राहिल्यास तसेच कार्यालयीन शिस्तिचा भंग केल्यास त्यांचेवर विभागप्रमुखांनी कारवाई करावी व त्याची एक प्रत प्रशासनास सादर करावी. प्रशिक्षण कालावधी पूर्ण होण्याच्या एक महिना आधी प्रशिक्षणर्थिंची संपुर्ण वर्षाची उपस्थिती व विद्यावेतन त्यांचे बँक खात्यावर जमा झाल्याच्या पासबुकची छायांकीत प्रत आपले स्वाक्षरीसह प्रशासनास सादर केल्याची खात्री करून व्यावसाईक परिक्षेस बसण्यास आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून आपले मार्फत परिक्षा फॉर्मवर स्वाक्षरी देण्यात यावी. मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सूचना केंद्र, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, पुणे. यांनी प्रशिक्षार्थींचा प्रशिक्षण कालावधी निश्चित केल्याने त्यानुसार प्रशिक्षणार्थिंना महापालिकेत नेंमणूक दिल्याने त्यांचा प्रशिक्ष ण कालावधी पूर्ण होताच त्यांना विभागामार्फत कार्यमुक्त करण्यात यावे. उमेदवारांचा प्रशिक्षण कालवधी निश्चित असल्याने त्यांच्या कालावधीत वाढ होणार नाही याची खबरदारी घेऊन कालावधीत वाढ करणेबबाबतचे प्रस्ताव सादर करू नयेत.

मा.प्राचार्य, मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र, द्वारा-औद्योगीक प्रशिक्षण संस्था पिंपरी चिंचवड, टेल्कोरोड निगडी, पुणे-१९.
यांना माहितीकरीता सादर

मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.